दि. ०९/०४/2023

पुढारी पान क्र.5

# भाजपा युवा मोर्चा अध्यक्षावर हल्ला करून दागिने लुटले

**वसई : पुढारी वृत्तसेवा**

भाजपच्या युवा मोर्चा अध्यक्ष प्रवीण गुप्ता यांच्यावर जीवघेणा हल्ला करून लाखो रुपयांचे दागिने पळवण्यात आले. सदर घटना कामण हनुमान मंदीराजवळ मध्यरात्री बारा वाजण्याच्या दरम्यान घडली. या हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या गुप्ता यांच्यावर रुग्णालयांत उपचार सुरू आहेत.



वसई तालुक्यातील भाजपा (ग्रामीण पुर्व) मंडळ युवा मोर्चाचे अध्यक्ष प्रवीण गुप्ता यांना तलवार, चॉपरचा धाक दाखवून त्यांच्या गळ्यातील सोन्याची चैन, लॉकेट व हातातील पँडल असा सुमारे पाच लाख चाळीस हजार रुपये कींमतीच्या ऐवजाची पाच जणांच्या टोळक्याने लूटकरुन स्कार्फीओ गाडीतून पोबारा केला. दरम्यान, या प्रविण गुप्ता यांना जखमी अवस्थेत रुग्णालयात दाखल करण्यात आले. या प्रकरणी नायगाव पोलिसांनी अज्ञातांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. आरोपी हल्लेखोरांना ओळखले असून पोलीस हल्लेखोरांचा शोध घेत आहेत.

# वाहने चोरणाऱ्या दोघांना अटक

**मिरारोड : पुढारी वृत्तसेवा**

पेल्हार पोलीस ठाणे हद्दीत दुचाकी वाहने चोरणाऱ्या दोघांना पेल्हार पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकाने अटक केली आहे. त्यांनी केलेले चार गुन्हे उघडकीस आणून चोरी केलेल्या ४ दुचाकी जप्त केल्या आहेत.

नालासोपारा पूर्वेच्या धानिवबा नाका येथे राहणाऱ्या सलिम युनूस अन्सारी ( २१ ) यांनी त्यांची दुचाकी क्रं. एम. एच. ४७ बी.ए. २९२६ ही घरासमोर उभी करून ठेवली होती. ही मोटार सायकल कोणीतरी अज्ञात चोरट्याने चोरी झाल्याबाबत पेल्हार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्हयाचे अनुषंगाने पेल्हार पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकांतील अधिकारी व अंमलदार यांनी तपास करून घटनास्थळावरील सी.सी.टी.व्ही. फुटेज तपासून आरोपी साजिद सलमानी ( २१ ) आबिद शाह ऊर्फ लंगडा ( १९ ) यांना ताब्यात घेवून तपास केला असता आरोपींनी गुन्हा केल्याचे निष्पन्न झाले. त्यांना या गुन्हयात अटक करून अधिक तपास केला असता त्यांनी पेल्हार पोलीस ठाण्यात३ व माणिकपूर पोलीस ठाण्यात१ असे ४ गुन्हे केल्याचे उघडकीस आले असून त्यांच्याकडून ४ मोटारसायकल जप्त केल्या आहेत.

पुढारी पान क्र. ४

# जूचंद्रच्या श्री चण्डिका देवी यात्रोत्सवास सुरुवात

**खानिवडे : पुढारी वृत्तसेवा**

वसई तालुक्यातील प्रसिद्ध श्री चंडिका देवीची वार्षिक चैत्रयात्रा यंदा शनिवार ८ एप्रिल ते सोमवार १० एप्रिल अशी तीन दिवस साजरा होत आहे. श्री चंडिका देवीचा भव्य पालखी सोहळा रविवार तारीख ९ एप्रिल २०२३ रोजी संकष्टी चतुर्थीला होणार असून यात्रोत्सव कालात लाखो भाविक प्रतिवर्षी श्री चंडिका देवीच्या दर्शनाला आणि नवस फेडण्यास गर्दी करतात श्री ग्रामदेवी जूचंद्र न्यासाने यात्रेची संपूर्ण सिद्धता केली आहे. भाविकांसाठी अनेक सोयी उपलब्ध केल्या आहेत. हजारो भाविकांची गर्दी लक्षात घेता पोलीस प्रशासन सज्ज झाले आहे. पोलीस प्रशासनातर्फे कडक सुरक्षा व्यवस्था तैनात करण्यात येणार आहे. रस्ते वाहतूक विभाग, सुरक्षा विभाग, वसई-विरार महापालिका अग्निशामक दल, आरोग्य सेवा, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ आदी विभाग आदींचे यात्रोत्सव काळात न्यासाला सहकार्य लाभणार आहे. श्री चंडिकादेवी यात्रेनिमित्त ओमकला ग्रुप जूचंद्रतर्फे प्रसिद्ध रांगोळीकारांचे रांगोळी प्रदर्शन आयोजित केले आहे

Scanned with CamScanner

दि. 09/04/2023

पुढारी पान क्र ३

# खुनाच्या गुन्ह्यातील फरार आरोपींना अटक

## ६ वर्षांपासून पोलिसांचा सुरू होता शोध



**मिरारोड : पुढारी वृत्तसेवा**

तुळींज पोलीस ठाण्याच्या हद्दीत २०१८ मध्ये एका इसमाचा तीन जणांनी मिळून खून केला होता. त्यातील एका आरोपीला पकडण्यात आले होते. परंतु दोन आरोपी गेल्या ६ वर्षांपासून फरार होते. त्या २ आरोपींना मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेने तपास करून अटक केली आहे..

तुळींज पोलीस ठाणे हद्दीत दिनांक २१ ऑक्टोबर २०१८ रोजी रात्री गौराईपाडा येथे सुनिल राजेश सहाणी (३६) व दिवाकर राकेश सिंग या दोघांमध्ये झालेल्या भांडणाचा मनात राग धरून २४ ऑक्टोबर २०१८ रोजी संतोष भवन, नालासोपारा पूर्व येथे आरोपी यांनी आपसात संगणमत करून सुनिल राजेश सहाणी याचा खून केला होता, त्याबाबत तुळींज पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्हयात यापूर्वी दिवाकर राकेश सिंग यास अटक करण्यात आली होती. पोलीस स्टेशन व तत्कालीन स्थानिक गुन्हे शाखा यांनी गुन्हयात पाहिजे आरोपी रमेशकुमार कोतवाल सिंग, सुधाकर राकेश सिंग यांचा शोध घेवूनही ते अद्यापपर्यंत मिळुन येत नव्हते. या गुन्हयाचा मध्यवर्ती गुन्हे शाखेकडून समांतर तपास चालू होता. त्याअनुषंगाने गुन्हयातील पाहिजे आरोपी रमेशकुमार कोतवाल सिंग, सुधाकर राकेश सिंग हे गुन्हा घडल्यापासून गोंडा, उत्तरप्रदेश येथे आपले अस्तित्व लपवुन राहत आहेत व आता ते बिलालपाडा, नालासोपारा पूर्व परिसरात आपल्या नातेवाईकांना भेटण्यासाठी येणार असल्याची माहिती स.पो.नि. दत्तात्रय सरक व हवालदार राजाराम काळे यांना मिळाली होती. त्यानुसार पोलीस निरीक्षक राहुल राख यांनी एक पथक तयार केले होते. या पथकाने त्याचे भेटण्याचे ठिकाणाबाबत माहिती मिळवून त्या ठिकाणी सापळा लावला. त्यावेळी रमेशकुमार कोतवाल सिंग (४०) व सुधाकर राकेश सिंग (२०) यांना ७ एप्रिल २०२३ रोजी ताब्यात घेण्यात आले आहे. या गुन्हयाच्या अनुषंगाने त्याच्याकडे तपास केला असता गुन्हयामध्ये सहभाग असल्याचे निष्पन्न झाले आहे. त्यांना पुढील तपासासाठी तुळींज पोलीस ठाणे यांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

Scanned with CamScanner

दि. 09/04/2023

पुढारी पान क्र.3

# भाईंदरमधील रिक्षा स्टॅण्ड अधिकृत कधी होणार?

## मनमानी रिक्षास्टँड वाहतूकीसह पादचाऱ्यांना ठरतोय अडसर

**भाईंदर : राजू काळे**

मिरा-भाईंदर महापालिका क्षेत्रातील रिक्षास्टँड अधिकृतच नसल्याचे अनेकदा समोर आले असताना अधिकृत स्टँडसाठी कार्यवाही करण्याचे आश्वासन पोलीस आयुक्तालय सुरु झाल्यानंतर देण्यात आले होते. आश्वासन देणाऱ्या अधिकाऱ्यांची बदली झाल्यानंतरही अनधिकृत रिक्षास्टँड अद्यापही अधिकृत झालेले नाहीत. यामुळे मनमानी पद्धतीने सुरु असलेले रिक्षास्टँड वाहतुकीसह पादचाऱ्यांना अडचणीचे ठरत असल्याचे दिसून आले आहे.

शहरात प्रामुख्याने भाईंदर पूर्व व पश्चिमेला तर मीरारोड पूर्वेकडे शहरातील महत्वाच्या ठिकाणी जाणारे मोठे रिक्षा स्टँड सुरु असून इतर ठिकाणी देखील अनधिकृत रिक्षास्टँड प्रवाशांच्या सोयीच्या आडून तडजोडीने सुरु करण्यात आले आहे. हे रिक्षास्टँड मनमानी पद्धतीने सुरु असले तरी ते प्रवाशांच्या सोयीकरीता आवश्यक असल्याचा सूर अनेकदा आवळला जातो. मात्र त्याचा गैरफायदा काही मुजोर रिक्षावाल्यांकडून घेतला जातो. ते मनमानी पद्धतीने रिक्षा कुठेही उभ्या करून तेथील वाहतुकीला अडथळा निर्माण करतात. तसेच शहरातील महत्वाच्या ठिकाणचे पदपथ अनधिकृत फेरीवाले तसेच दुकानदारांकडून व्यापले जात असल्याने दुकानासमोरच दुकानदारांची वाहने उभी केलेली असतात. त्या वाहनांच्या बाजूलाच रिक्षास्टँड निर्माण करून त्या उभ्या केल्या जात असल्याने त्यांचा



वाहतुकीला अडथळा ठरतोच तसेच पादचाऱ्यांना देखील तेथून ये-जा करणे त्रासदायक ठरते. त्यातच रिक्षा कशाही उभ्या केल्या जात असल्याने वाहतूक व लोकांच्या अडचणीत भर पडते. त्यामुळे शहरातील अनधिकृत रिक्षास्टँडचे नियोजन करून लोकांच्या तसेच वाहतुकीच्या अडचणी दूर करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

### पादचाऱ्यांना त्रासातून मुक्त करा

भाईंदर पूर्व, पश्चिमेला रेल्वे परिसरात असलेले स्टँड रेल्वेने प्रशासनाने बंद पडल्याने तेथील रिक्षा आता बाहेर उभ्या केल्या जातात. तसेच मुख्य बाजारपेठा व लोकवस्तींच्या ठिकाणी असलेल्या अरुंद रस्त्यांवर सुरू असलेल्या रिक्षास्टँडला पर्यायी मोकळी जागा देऊन ते रिक्षा स्टँड अधिकृत करण्यात यावे, यासाठी पालिका व पोलिसांनी ठोस प्रयत्न करून वाहतूक व पादचाऱ्यांना त्रासातून मुक्त करावे, अशी मागणी होऊ लागली आहे.

पुढारी पान क्र.1

# बोगस कॉलने मुंबई हादरली



मुंबई : मुंबई, ठाण्यात रेल्वे स्थानकांसह गर्दीच्या ठिकाणी श्वानपथकांकडून तपासणी करण्यात आली. ठिकठिकाणी नाकेबंदी व गस्तही वाढवली गेली.

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

मुंबईमध्ये तीन अतिरेकी घुसले असून त्यांचा संबंध पाकिस्तानशी असल्याचा दावा करणारा एक कॉल शुक्रवारी दुपारी मुंबई पोलिसांच्या मुख्य नियंत्रण कक्षात आल्याने पोलिस यंत्रणा खडबडून जागी झाली. मुंबई पोलिसांनी या कॉलची दखल घेत मुंबईत हाय अलर्ट जारी करत शहरातील बंदोबस्तात वाढ केली.

हा फोन करणाऱ्याने स्वत:चे नाव राजा ठोंगे (रा. पुणे) सांगितले. दुबईवरून मुंबईत आलेल्या दहशतवाद्यांकडे एमएच-१६/बीझेड-८२३२ या क्रमांकाची गाडी असल्याची माहितीही त्याने दिली. पडताळणी केली असता तो नंबर बीडमधील एका व्यक्तीच्या गाडीचा निघाला. त्याच्याकडे चौकशी केल्यानंतर हा बोगस कॉल आल्याचे निष्पन्न झाले आणि मुंबईने सुटकेचा नि:श्वास टाकला.

फोन करणाऱ्याने बीडच्या व्यक्तीच्या नावाने सीम कार्ड घेतले आणि हा फोन केला. यातून सीम कार्डचा काळाबाजार ही नवी डोकेदुखी समोर आली.

Scanned with CamScanner

दि. 09/04/2023

लोकमत पान क्र.5

## कारच्या धडकेत एकाचा मृत्यू

नालासोपारा : कारच्या धडकेत एका व्यक्तीचा अपघातात मृत्यू झाल्याची घटना नालासोपारा येथे घडली. आचोळे रोड येथील मेडिकल समोर २३ मार्चला पहाटे तीनच्या सुमारास एका भरधाव कारने ६० वर्षीय अनोळखी व्यक्तीला जोरदार धडक दिली होती. या अपघातात त्या व्यक्तीचा जागीच मृत्यू झाला होता. आचोळे पोलिस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली. मात्र तपासादरम्यान आरोपी कारचालकाने निष्काळजीपणे वाहन चालवून अपघात घडवून मृत्यूस कारणीभूत ठरल्याप्रकरणी शुक्रवारी आचोळे पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## कौटुंबिक वादातून गळफास

नालासोपारा : विरारमध्ये कौटुंबिक वादातून एकाने गळफास घेतला आहे. भाताणे परिसरातील हत्तीपाडा, फलटपाडा येथे राहणाऱ्या विजय नाना बरफ (२५) याने गुरुवारी रात्री दहाच्या सुमारास शेतामध्ये पाळीव जनावरे बांधण्याच्या दोरीने आंब्याच्या झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केली होती. विजय याचा तीन वर्षांपूर्वी प्रेमविवाह झाला होता. मात्र वादानंतर पत्नी मुलाला घेऊन माहेरी निघून गेली होती. घटनेच्या दिवशी पती-पत्नीमध्ये फोनवरून भांडण झाल्यानंतर विजयने आत्महत्येचा निर्णय घेतला.

म.टा. पान क्र.7

# ...म्हणून 'जेपीसी' नको

## 'अदानी'प्रकरणी शरद पवार यांनी स्पष्ट केली भूमिका


**म. टा. खास प्रतिनिधी, मुंबई**

उद्योगपती गौतम अदानी प्रकरणात संयुक्त संसदीय समितीमार्फत (जेपीसी) चौकशी नको, या आपल्या भूमिकेचा राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी शनिवारी मुंबईत पुनरुच्चार केला. 'जेपीसी'मध्ये भाजपचे सदस्य अधिक असतील आणि विरोधी पक्षातील सदस्यांची संख्या कमी असेल. त्यामुळे त्या समितीविषयी शंका व्यक्त करायला संधी राहू शकते. त्यामुळे 'जेपीसी'ऐवजी सर्वोच्च न्यायालयाने नेमलेल्या समितीकडून केली जाणारी चौकशी ही अधिक संयुक्तिक ठरेल, असा तर्क मांडत पवार यांनी आपली भूमिका स्पष्ट केली.

मुंबईत आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना- त्यांनी हा तर्क मांडला. 'अदानी'प्रकरणी जेपीसी चौकशीसंदर्भात शुक्रवारी दिल्लीत भूमिका जाहीर केल्यानंतर भाजपविरोधातील आघाडीत फूट पडल्याच्या तसेच राज्यातील महाविकास आघाडी धोक्यात आल्याच्या चर्चांना उधाण आले होते. त्याला पूर्णविराम लावण्यासाठी अखेर शरद पवार यांनी मुंबईत पत्रकारांशी संवाद साधत आपली भूमिका स्पष्ट केली. 'अदानीप्रकरणी चौकशीसाठी जेपीसीऐवजी सर्वोच्च न्यायालयाने एक समिती नियुक्त करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामध्ये सर्वोच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायाधीश आणि इतर लोक आहेत. सर्वोच्च न्यायालयाने यासंदर्भात अहवाल किती दिवसांत द्यायचा याबाबतची सूचनाही केली आहे. माझा जेपीसीला सरसकट विरोध नाही. यापूर्वी काही जेपीसींचे अध्यक्षपदही माझ्याकडे होते', असे शरद पवार यांनी सांगितले. 'विरोधी पक्षातील लोकांच्या मताचा मी सन्मान करतो. त्यांना माझे मतही सांगेन, पण चर्चा होईल तेव्हा यावर बोलेन. १८-१९ विरोधी पक्ष या मुद्द्यावर एकत्र आले ही गोष्ट खरी असली तरी या पक्षांतील लोकांना संसदीय समितीमध्ये सहभागी होण्याची संधी मिळणार नाही. ज्यांची सदस्य संख्या एक-दोन आहे त्यांना ही संधी मिळणार नाही, ठराविक पक्षांनाच ही संधी मिळेल', याकडेही पवार यांनी लक्ष वेधले. राहुल गांधी यांनी अदानींबाबत २० हजार कोटी रुपयांचा आरोप केला आहे. त्याबाबत बोलताना, '२० हजार कोटी वगैरे याची आकडेवारी माझ्याकडे नाही. याबाबतची माहिती घेऊन बोलेन. एखाद्या गोष्टीवर बोलायचे तर त्याची माहिती माझ्याकडे असणे आवश्यक आहे', असे शरद पवार यांनी स्पष्ट केले.

### ... तर लोकांचा विश्वास बसेल

'हिंडेनबर्ग कोण आहे हे मला माहीत नाही. त्यांचा अहवाल वर्तमानपत्रात वाचला. एक परदेशातील कंपनी या देशातील परिस्थितीवर भूमिका घेते. त्यावर किती लक्ष केंद्रित करावे याचा विचार करायला हवा. परदेशी संघटनेने देशातील बाबींबाबत आम्हाला सांगण्यापेक्षा या देशातील सर्वोच्च न्यायालयाने सांगितल्यास ते लोकांच्या अधिक विश्वासास पात्र ठरेल', असे शरद पवार यांनी सांगितले.



### मतभिन्नता असू शकते

'जेव्हा अनेक पक्ष एकत्र येत असतात तेव्हा काही प्रश्नांवर मतभिन्नता असू शकते. उदाहरणार्थ खरे यांच्या घरी बैठक घेतली त्यावेळी सावरकरांचा विषय निघाला. त्या बैठकीत सावरकरांबद्दल भूमिका मांडली. चर्चा झाली परंतु त्यानंतर विषय संपला. त्यामुळे चर्चा होत असते, मतभिन्नताही असू शकते. मते मांडण्याची प्रत्येकाला संधी असते', असे पवार म्हणाले.

### 'अजित पवार माझ्या संपर्कात'

शनिवारी रात्रीपासून अजित पवार नॉट रिचेबल झाल्याचे वृत्त वाऱ्यासारखे पसरले होते. मात्र, 'अजित पवार माझ्या संपर्कात होते. मला माहीत नाही तुम्ही कशाच्या आधारावर हे बोलताय. सुप्रिया सुळे इथे समोर नाहीत मात्र त्या घरात आहेत. याचा अर्थ त्या 'नॉट रिचेबल' आहेत असा नाही', असे पवार यांनी यावेळी स्पष्ट केले.

Scanned with CamScanner

# दोपहिया वाहन चोर पेल्हार पुलिस ने पकड़ा, वाहन जप्त



**वसई।** दोपहिया वाहन चोरी करने वाले दो शातिर आरोपी को गिरफ्तार किए गए है,तथा 4 अपराधों (वाहन चोरी) का खुलासा हुआ है। यह कार्रवाई परिमंडल 3 (डीसीपी) सुहास बावचे व एसीपी रामचंद्र देशमुख के मार्गदर्शन में पेल्हार थाने के सीनियर पी.आई वसंत लब्दे, पी.आई ( क्राइम ) महेंद्र शेलार व पी.एस.आई सनिल पाटिल के नेतृत्व में क्राइम डिटेक्शन सेल के अधिकारी-कर्मचारी ने की है। यह जानकारी पुलिस ने शनिवार को दी है। पुलिस ने बताया कि पेल्हार थाने अंतर्गत सलीम युनूस अन्सारी (21),निवासी-धानिवबाग नाका,नालासोपारा पूर्व में रहता है। 9 मार्च 2023 को रात्रि 1 व सुबह 7 बजे के दरम्यान अज्ञात चोर ने हीरो होंडा पॅशन प्रो. मोटार सायकल (एमएच 47/बी.ए 2926) चोरी कर फरार हो गया,इस मामले में सलीम ने पेल्हार थाने में अज्ञात चोर के खिलाफ केस दर्ज करवाया था। पुलिस ने बताया कि उपरोक्त अपराध के संबंध में वरिष्ठजनों द्वारा दिये गये निर्देश एवं मार्गदर्शन के अनुसार पेल्हार थाना के क्राइम डिटेक्शन सेल के अधिकारियों एवं कर्मचारी ने घटना स्थल के सीसीटीवी फुटेज एवं गुप्त सूचना के आधार पर आरोपी (1). साजिद सलमानी (21) व (2).आबिद शाह ऊर्फ लंगडा (19) को 6 अप्रैल को हिरासत में लेकर पूछताछ के बाद पता चला कि आरोपियों ने उपरोक्त अपराध को अंजाम दिया है, उसे उक्त अपराध में गिरफ्तार किया गया। आगे की जांच पर आरोपियों के पास से 04 अपराध की 04 मोटर साइकिलें जब्त की गई हैं। आगे की तहकीकात पलिस कर रही है।

Scanned with CamScanner

1997 से
KAT खबरें आज तक
not a publication of the living media india group
वर्ष: 26 अंक-294 मुंबई, रविवार 9 अप्रैल 2023 पृष्ठ-12 मूल्य: 2.00

# दोपहिया वाहन के साथ दो शातिर चोर गिरफ्तार, चार मामलों का हुआ खुलासा

**वसई :** दोपहिया वाहन चोरी करने वाले दो शातिर आरोपी को गिरफ्तार किए गए है, तथा 4 अपराधों ( वाहन चोरी ) का खुलासा हुआ है। यह कार्रवाई परिमंडल 3 (डीसीपी) सुहास बावचे व एसीपी रामचंद्र देशमुख के मार्गदर्शन में पेल्हार थाने के सीनियर पी.आई वसंत लब्दे, पी.आई ( क्राइम ) महेंद्र शेलार व पी.एस.आई सनिल पाटिल के नेतृत्व में क्राइम डिटेक्शन सेल के अधिकारी-कर्मचारी ने की है।यह जानकारी पुलिस ने शनिवार को दी है।पुलिस ने बताया कि पेल्हार थाने अंतर्गत सलीम युनूस अन्सारी (21), निवासी-धानिवबाग नाका, नालासोपारा पूर्व में रहता है। 9 मार्च 2023 को रात्रि 1 व सुबह 7 बजे के दरम्यान अज्ञात चोर ने हीरो होंडा पॅशन प्रो. मोटार सायकल ( एमएच 47/बी.ए 2926 ) चोरी कर फरार हो गया, इस मामले में सलीम ने पेल्हार थाने में अज्ञात चोर के खिलाफ केस दर्ज करवाया था।पुलिस ने बताया कि उपरोक्त अपराध के संबंध में वरिष्ठजनों द्वारा दिये गये निर्देश एवं मार्गदर्शन के अनुसार पेल्हार थाना के क्राइम डिटेक्शन सेल के अधिकारियों एवं कर्मचारी ने घटना स्थल के सीसीटीवी फुटेज एवं गुप्त सूचना के आधार पर आरोपी (1). साजिद सलमानी (21) व ( 2 ).आबिद शाह ऊर्फ लंगडा ( 19 ) को 6 अप्रैल को हिरासत में लेकर पूछताछ के बाद पता चला कि आरोपियों ने उपरोक्त अपराध को अंजाम दिया है, उसे उक्त अपराध में गिरफ्तार किया गया, आगे की जांच पर आरोपियों के पास से 04 अपराध की 04 मोटर साइकिलें जब्त की गई हैं।आगे की तहकीकात पुलिस कर रही है।



Scanned with CamScanner

# 6 साल पहले हत्या के मामले में फरार 2 आरोपी हुए गिरफ्तार



**दबंग रिपोर्टर » वसई**

6 साल पहले हत्या के मामले में वांछित 2 आरोपियों को मध्यवर्ती अपराध जांच शाखा की टीम ने गिरफ्तार करने में सफलता अर्जित की है। यह कार्रवाई डीसीपी (क्राइम) अविनाश अंबुरे व एसीपी अमोल मांडवे के मार्गदर्शन में मध्यवर्ती अपराध जांच शाखा के पी.आई राहुल राख की टीम ने की है। यह जानकारी पुलिस अधिकारी ने शनिवार को दी।

पुलिस ने बताया कि तुलिंज थानांतर्गत 21 अक्टूबर 2018 में गौराईपाडा क्षेत्र में सुनिल राजेश सहाणी (36), निवासी-बिलाल पाडा नालासोपारा पूर्व व दिवाकर सिंह, निवासी- नालासोपारा पूर्व के साथ हुए झगड़े को लेकर 24 अक्टूबर 2018 को बिलालपाडा, संतोष भवन नालासोपारा पूर्व स्थित आरोपियों ने आपस में मिलीभगत कर सुनील राजेश साहनी को लकड़ी के डंडों व लठ्ठाबुकियों से बुरी तरह पीटा और गंभीर रूप से घायल कर उसकी हत्या कर दी। इस मामले में तुलिंज थाने में आरोपियों के ऊपर कलम 302,34 के तहत केस दर्ज किया गया था। पुलिस ने बताया कि इससे पहले दिवाकर राकेश सिंह को उपरोक्त अपराध में गिरफ्तार किया गया था। थाना पुलिस व तत्कालीन स्थानीय क्राइम ब्रांच ने आरोपी रमेश कुमार कोतवाल सिंह, सुधाकर राकेश सिंह की तलाश की, लेकिन उनका पता नहीं चला। पुलिस के मुताबिक,उक्त गंभीर अपराध में वांछित आरोपियों की तलाशी के संबंध में वरिष्ठों ने निर्देश एवं मार्गदर्शन दिया था।

मध्यवर्ती अपराध शाखा द्वारा उक्त अपराध की समानांतर जांच चल रही थी, इसके अनुसार अपराध में वांछित आरोपी रमेश कुमार कोतवाल सिंह, सुधाकर राकेश सिंह अपराध होने के बाद से उत्तर प्रदेश के गोंडा में अपना अस्तित्व छिपा रहे हैं,लेकिन टीम को गोपनीय सूचना मिली है कि वह बिलालपाड़ा, नालासोपारा पूर्व क्षेत्र में अपने रिश्तेदारों से मिलने आने को सूचना स.पो.नि.दत्तात्रय सरक व पो. हवा.राजाराम काले को मिली। पी.आई राहुल राख के मुताबिक एक टीम बनाई गयी,उक्त टीम को उसके मिलने की जगह के बारे में जानकारी मिली और उस जगह पर जाल बिछाया व आरोपी (1).रमेशकुमार कोतवाल सिंह (40) व (2).सुधाकर राकेश सिंह (20) को 7 अप्रैल को हिरासत में ले लिया,पुलिस के बताया कि उपरोक्त अपराध के संबंध में पता चला है कि वह उक्त अपराध में शामिल है।फिलहाल, आगे की जांच पुलिस कर रही है।

Scanned with CamScanner

लोकमत



३६ वर्षीय व्यक्तिची हत्या करून सहा वर्षे फरार असणाऱ्या दोन आरोपींना अटक करण्यात मध्यवर्ती गुन्हे शाखेच्या पोलिसांना यश आले आहे.

# हत्या करून सहा वर्षे फरार दोन आरोपींना अटक

## मध्यवर्ती गुन्हे शाखा पोलिसांची कामगिरी

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** तुळींज पोलिस ठाण्याच्या हद्दीत ३६ वर्षीय इसमाची हत्या करून सहा वर्षे फरार असणाऱ्या दोन आरोपींना अटक करण्यात मध्यवर्ती गुन्हे शाखेच्या पोलिसांना यश मिळाल्याची माहिती जनसंपर्क अधिकारी विशाल धायगुडे यांनी शनिवारी दिली.

बिलालपाडा नाका येथे राहणारे सुनील राजेश सहाणी (३६) यांचे संतोष भवन येथे राहणारे दिवाकर राकेश सिंग यांच्यासोबत २१ ऑक्टोबर २०१८ साली गौराईपाडा येथे भांडण झाले होते. या भांडणाचा मनात राग धरून २४ ऑक्टोबर २०१८ रोजी सुनील यांना लाकडी दांडक्याने व लाथाबुक्क्यांनी मारहाण करून जिवे ठार मारले होते. तुळींज पोलिसांनी हत्येचा गुन्हा दाखल करून आरोपी दिवाकर राकेश सिंग याला अटक केली होती. पोलिस ठाणे व तत्कालीन स्थानिक गुन्हे शाखा यांनी गुन्ह्यात पाहिजे असलेले आरोपी रमेशकुमार कोतवाल सिंग, सुधाकर राकेश सिंग यांचा शोध घेऊनही ते मिळून आले नव्हते.

या गुन्ह्यातील फरार आरोपींचा शोध घेण्याबाबत वरिष्ठांनी सूचना व मार्गदर्शन केले होते. या गुन्ह्याचा मध्यवर्ती गुन्हे शाखेकडून समांतर तपास चालू होता. गुप्त बातमीदाराकडून मिळालेल्या माहितीनुसार पोलिस निरीक्षक राहुल राख यांनी एक पथक तयार केले. या पथकाने सापळा रचून आरोपी रमेशकुमार कोतवाल सिंग (४०) आणि सुधाकर राकेश सिंग (२०) यांना ८ एप्रिलला शिताफीने ताब्यात घेतले. त्यांना अटक करून पुढील तपासासाठी तुळींज पोलिसांच्या ताब्यात दिले आहे.

ही कामगिरी पोलिस उपायुक्त (गुन्हे) अविनाश अंबुरे, सहायक पोलिस आयुक्त (गुन्हे) अमोल मांडवे यांच्या मार्गदर्शनाखाली मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेचे पोलिस निरीक्षक राहुल राख, सहायक पोलिस निरीक्षक दत्तात्रय सरक, पोलिस हवालदार राजाराम काळे, अशपाक मुल्ला, शिवाजी पाटील, गोविंद केंद्रे, सुनील कुडवे, हनुमंत सूर्यवंशी, संतोष चव्हाण यांनी केली.

### आरोपी येणार होते नातेवाईकांना भेटायला

गुन्ह्यातील फरार आरोपी हे गुन्हा घडल्यापासून गोंडा, उत्तर प्रदेश येथे आपले अस्तित्व लपवून राहत असून आता ते नालासोपाऱ्याच्या बिलालपाडा परिसरात आपल्या नातेवाईकांना भेटण्यासाठी येणार असल्याबाबतची गोपनीय माहिती सहायक पोलिस निरीक्षक दत्तात्रय सरक व हवालदार राजाराम काळे यांना मिळाली होती.

Hello Vasai
Page No. 1 Apr 09, 2023
Powered by: erelego.com

Scanned with CamScanner

# दुचाकी चोरणारी दुकली अटकेत, ४ गुन्ह्यांची उकल

## पेल्हार गुन्हे प्रकटीकरण पथकाचे यश

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** दुचाकी चोरी करणाऱ्या दुकलीला पेल्हारच्या गुन्हे प्रकटीकरण पथकाच्या पोलिसांनी अटक केली आहे. या दोन्ही आरोपींकडून चार गुन्ह्यांची उकल करत चार दुचाकी हस्तगत करण्यात पोलिसांना यश मिळाल्याची माहिती जनसंपर्क अधिकारी विशाल धायगुडे यांनी शनिवारी दिली आहे.

धानिवबाग नाका येथे राहणारा तरुण सलिम युनूस अन्सारी (२१) याची दुचाकी ९ मार्चच्या रात्री राहत्या घराच्या परिसरात पार्किंगमधून चोरी झाली होती. गुन्ह्याच्या अनुषंगाने वरिष्ठांच्या मार्गदर्शनाप्रमाणे पेल्हार पोलिस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी बातमीदार व सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे आरोपी साजिद सलमानी (२१) आणि आबिद शाह ऊर्फ लंगडा (१९) या दोघांना ६ एप्रिलला ताब्यात घेतले. आरोपींकडे चौकशी केल्यावर तो गुन्हा केल्याचे स्पष्ट झाल्यावर या गुन्ह्यात त्यांना अटक करण्यात आली. अटक आरोपींकडे अधिक तपास करून ४ गुन्ह्यांची उकल करून ४ दुचाकी हस्तगत करण्यात आल्या आहेत.

ही कामगिरी पोलिस उपायुक्त सुहास बावचे, सहायक पोलिस आयुक्त रामचंद्र देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पेल्हार पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक वसंत लब्दे, पोलिस निरीक्षक (गुन्हे) महेंद्र शेलार व गुन्हे प्रकटीकरण पथकाचे पोलिस उपनिरीक्षक सुनील पाटील, पोलिस हवालदार योगेश देशमुख, तुकाराम माने, तानाजी चव्हाण, प्रताप पाचुंदे, संदीप शेळके, मोहसीन दिवाण, सचिन बळीद, बालाजी गायकवाड, किरण आव्हाड, रोशन पुरकर, निखिल मंडलिक यांनी केली आहे.

Hello Vasai
Page No. 1 Apr 09, 2023
Powered by: erelego.com

Scanned with CamScanner

लोकमत

# मंदिरात चोरी, चोरटा अटकेत

नालासोपारा : मंदिरात चोरी करणाऱ्याला रंगेहाथ पकडण्यात नागरिकांना यश आले आहे. मधुवन परिसरात असलेल्या श्रीकृष्ण मंदिरात गुरुवारी मध्यरात्री दीड वाजण्याच्या सुमारास चिंचपाडा येथील भावेश महेश वेदक या चोरट्याने प्रवेश करत, तेथील दानपेटी तोडण्याचा प्रयत्न केला. मात्र, दानपेटी तोडता न आल्याने त्याने जवळच ठेवलेले लोखंडाचे हवनकुंड उचलून ते पळविण्याचा प्रयत्न करताना परिसरातील नागरिकांनी त्याला रंगेहाथ पकडले. आरोपीच्या विरोधात शुक्रवारी वालीव पोलिसांनी चोरीचा गुन्हा

Hello Vasai
Page No. 1 Apr 09, 2023
Powered by: erelego.com

Scanned with CamScanner